# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६
## (सकाळी ०९-४५ ते १०-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**श्री. उदय सामंत, मंत्री**
----------------
**श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री**

(१) **श्री. राजन नाईक, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. पराग शाह, प्रविण दटके, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"MMRDA क्षेत्राचा भाग असलेल्या वसई - विरार उपप्रदेशासाठी शासनाकडून १९९० मध्ये सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात येणे, सिडकोने तयार केलेला २००१-२०२१ या कालावधीचा विकास आराखडा महानगरपालिका आयुक्तांच्या संमतीने दिनांक ०९ फेब्रुवारी, २००७ रोजी मंजूर केलेला असणे, या आराखड्याची मुदत २०२१ मध्ये संपुष्टात आल्यानंतर वसई-विरार शहर महानगरपालिकेने MRTP कायदा, १९६६ च्या कलम २३ व ३८ नुसार दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी सुधारित विकास आराखडा तयार करण्याबाबत नोटीस प्रसिद्ध केली असणे, या क्षेत्रातून बुलेट ट्रेन, कोस्टल रोड त्याचप्रमाणे चौथ्या मुंबईचे नियोजन, मनपा क्षेत्राची सध्या वेगाने वाढणारी लोकसंख्या, अपुऱ्या पायाभूत सुविधा, अनधिकृत बांधकामे यांसारख्या गंभीर समस्या पाहता विशेष नियोजनाची आवश्यकता असणे, अनेक धोरणात्मक प्रकल्प आणि सध्याची अनधिकृत व नियोजनबाह्य बांधकामे धरुन सुधारित विकास आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक असलेले अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ महानगरपालिकेकडे उपलब्ध नसणे, MRTP कायदा कलम १६२ मध्ये कोणतेही नियोजन प्राधिकरण त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यास कार्यक्षम नसल्यास राज्य शासनास अशा अधिकाराचा वापर करण्याची तरतुद असणे, या पार्श्वभूमीवर महापालिकेने प्रसिद्ध केलेली नोटीस रद्द करून सुधारित विकास आराखडा तयार करण्यासाठी कलम १६२ नुसार MMRDA आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**श्री. उदय सामंत, मंत्री**
----------------
**श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री**

(२) **श्री.अस्लम शेख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील मालाड (पुर्व) येथील PAP प्रकल्प (CTS क्र. 827/A/4A/2) संदर्भात गंभीर अनियमितता झाल्याचे दस्तऐवजांवरून स्पष्ट होणे, सदर भूखंड

मूलतः "पोलीस स्टाफ क्वार्टर्स" साठी राखीव असताना तो PAP गृहनिर्माणासाठी वापरण्यात येणे, प्रकल्पाच्या LOA मध्ये माहे एप्रिल, २०२५ नंतर दुरुस्ती करून प्रति घरकुल खर्च रुपये ३२.२१ लाखांवरून तब्बल रुपये ५०.९८ लाखांपर्यंत वाढविण्यात आला असणे, ज्यामुळे सुमारे रुपये ६१८ कोटींची अतिरिक्त आर्थिक वाढ झाली असणे, या GR ने १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी ASR दर रुपये ८४,४६० प्रति चौ.मी. योग्य असल्याचे स्पष्ट केले असणे, मुंबईतील विविध पायाभूत सुविधांचे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी सद्य:स्थितीत अंदाजे ५०,००० पी.ए.पी. सदनिकांची आवश्यकता असणे, मुंबईचा विकास आराखडा (DP) राबविण्यासाठी २,२०,००० पी.पी.ए. सदनिकांची आवश्यकता असल्याचे कृती दलाच्या निदर्शनास आले असणे, मात्र दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी अचानक सर्व्हे क्रमांक बदलून दर रुपये १,३३,६७० प्रति चौ.मी. करण्यात येणे, कोणतीही नव्याने प्रत्यक्ष पाहणी किंवा स्वतंत्र मूल्यांकन न करता हा बदल करण्यात आल्याने संगनमताचा संशय निर्माण होणे, तसेच, टेंडर अटींनुसार टप्प्याटप्प्याने देयके देणे अपेक्षित असताना ५०% TDR व प्रीमियम आगाऊ देण्यात येणे, या सर्व बाबींची उच्चस्तरीय चौकशी करून दुरुस्त LOA स्थगित करण्याची व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. शंभुराज देसाई, मंत्री
----------------
डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री

**(३) सर्वश्री.अनंत (बाळा) नर, मुरजी पटेल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रामध्ये मयुर नगर, मोराचा पाडा मौजे मरोशी ता.बोरीवली न.भू.क्र १६२७(पै) सर्वे नं १६९ येथे २५ वर्षापूर्वी झोपडपट्टी पुनर्विकास योजना ( एसआरए ) राबविली जात असणे, सदरहू संपूर्ण काम अर्धवट असून स्थानिक रहिवाशांना मुलभूत सुविधा पुरविलेल्या नसणे, सदर वसाहतीमध्ये ७५१ लाभार्थी असणे, त्या रहिवाशांचे परिशिष्ट-२ अदयाप केलेले नसणे, विकासकाने स्वत:च झोपडपट्टी वासियांना घरांचा ताबा देणे, सदर इमारतीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होणे, शासनाला देय असलेली पीएपी साठी राखीव असलेली घरे न देणे, नियमाप्रमाणे अधिकृत रस्ता त्या वसाहतीला उपलब्ध न करणे, धोकादायक इमारतीत रहिवाशी जीवन जगत असणे, याठिकाणी विकासकाने प्रचंड अनियमितता केल्यामुळे त्याचेवर कारवाई करण्याची आणि या सर्व इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री

**(४) श्री. उत्तमराव जानकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील निरा-देवघर व गुंजवणी प्रकल्प धरणाचे कालवे कार्यान्वित नसल्यामुळे निरा-देवघर प्रकल्पाचे पाणी किंवा गुजवणीचे पाणी निरा उजवा कालव्यास उपलब्ध होत नसणे, त्यामुळे निरा उजवा

कालव्याच्या मूळ लाभक्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम होणे, निरा-देवघर प्रकल्पांतर्गत तालुक्यातील मुख्य कालवा किमी १३४/७६० येथून खाजगी/सहकारी उपसा सिंचन योजनेचे काम प्रलंबित असणे, सदरच्या खाजगी उपसा सिंचन योजनेऐवजी शासकीय उपसा सिंचन योजना करुन माळशिरस तालुक्यातील १६ दुष्काळग्रस्त गावांना पाणी मिळणेबाबत लोकप्रतिनिधींची मागणी असणे, त्यानुषंगाने निरा-देवघर प्रकल्पांतर्गत तालुक्यातील सहकारी उपसा सिंचन योजनेऐवजी शासकीय उपसा सिंचन योजनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त असणे, त्यानुसार शासन निर्णय, धोरण व पाणी उपलब्धता इ. बाबींचा अभ्यास करुन सदर प्रकरणी शासनाकडून उचित कार्यवाही होत नसणे, निरा-देवघर प्रकल्पाचा मुख्य कालवा १५८ कि.मी. लांबीचा असून कि.मी. ० ते ६५ मधील कालवा कामे ही पारंपारिक उघड्या पध्दीतीने पूर्ण झालेली असून कि.मी. ६६ ते १५८ हा बंदिस्त नलीकेद्वारे प्रस्तावित कामे प्रलंबित असणे, तर कि.मी. ६६ ते ८७ ची प्रगतीत असलेली कामेही अद्यापी प्रलंबित असणे, सदरच्या कामाच्या खर्चाचा प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये समावेश असून निधीअभावी सदरहू कामे प्रलंबित असणे, याबाबत शासनाने चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) सर्वश्री. किसन कथोरे, समाधान आवताडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**श्री. उदय सामंत, मंत्री**
----------------
**श्री. इंद्रनील नाईक, राज्यमंत्री**

"ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ व मुरबाड तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या बारवी धरणात विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पुनर्वसन करून ज्यांची घरे बाधित झाली त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीमध्ये सामावून घेण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येणे, यामध्ये ज्या नगरपरिषदा किंवा महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्था या धरणाच्या पाण्याचा लाभ घेतात त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत निर्णय होणे, त्यानुसार या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्यात येणे, उर्वरित ज्यांच्याकडे पात्र लाभार्थी नाही अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना एकरकमी दहा लाख रुपये देण्यात येणे, परंतु नोकरीमध्ये सामावून घेतलेल्या वारसांना पदोन्नती देण्यात येणार नसल्याचे सांगण्यात येणे, तसेच ते नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यास, मृत्यू झाल्यास, बडतर्फ झाल्यास किंवा काही अपरिहार्य कारणास्तव नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यास त्यांच्या घरातील व्यक्तींना अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून न घेणे, ही बाब त्यांच्यावर अन्यायकारक असणे, त्यामुळे याबाबतीत त्यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत शासनाने कोणतीही प्रतिक्रिया न देणे, त्यामुळे या बारवी धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या नोकरीत सामावून घेतलेल्या वारसांवर अन्याय होणे, याकरीता राज्य शासनाने त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करण्याबाबत शासनाने करावयाची वा करण्यात येणारी कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**श्री. मकरंद जाधव-पाटील, मंत्री**

----------------

**ॲड. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री**

"नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील गमन येथील श्री हुन्या रुपा वसावे यांना आयुक्त, महसूल नाशिक विभाग यांच्या दिनांक ०६ एप्रिल, २००५ रोजीच्या आदेशान्वये प्रकल्पग्रस्त म्हणून घोषित करण्यात आलेले असणे, परंतु उपलब्ध सर्वेक्षण नोंदी १९८७ च्या यादीतील अनुपस्थिती तसेच संबंधित कागदपत्रांतील विसंगती यावरुन त्यांची जमीन प्रत्यक्षात प्रकल्पाच्या बुडीत अथवा बाधित क्षेत्रात गेलेली नसल्याची बाब समोर येणे, किरसिंग हुण्या वसावे हे त्यावेळी नर्मदा बचाव आंदोलनात सक्रीय कार्यकर्ता असल्याने अधिकाऱ्यांसोबत संगनमत करुन त्यांनी सदर क्षेत्र हे बाधित दाखऊन संबंधितांनी प्रकल्पग्रस्त या नात्याने शासनाकडून आर्थिक मोबदला व पुनर्वसन लाभ स्वीकारले असल्याची गंभीर तक्रार प्राप्त होणे, यामुळे खऱ्या पात्र प्रकल्पग्रस्तांवर अन्याय तसेच शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय होणे, संबंधित प्रकरणात कागदपत्रांची पडताळणी न करता लाभ मंजूर केल्याने निर्माण झालेला प्रशासकीय हलगर्जीपणा, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व कालबद्ध चौकशी करुन अपात्र लाभ तात्काळ वसूल करण्याबाबत तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. शंकर जगताप, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**श्री. आकाश फुंडकर, मंत्री**

----------------

**ॲड. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री**

"पुणे जिल्हयातील हिंजवडी आयटीपार्कमध्ये १,००० फ्रेशर्स पदवीधरांना एका फसवणूक करणाऱ्या कंपनीने नोकरी देण्याच्या नावाखाली त्यांचेकडून सुमारे २ लाख रुपये घेऊन फसवणूक केली असल्याचे निदर्शनास येणे, हिंजवडी घोटाळ्यातील फ्रेशर्स पदवीधरांचे पैसे परत मिळविण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याची आवश्यकता असणे, टीसीएस व इतर आयटी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना कॉन्फरन्स रूममध्ये नेऊन दबावाखाली राजीनामा देण्यास भाग पाडले जात असणे, कोणतेही आर्थिक पॅकेज न देता बेकायदेशीर कामावरून काढून टाकण्यात येणे, आयटी कंपन्यांमध्ये नोकरी सोडणे, जबरदस्तीने राजीनामे घेण्याच्या सत्रामुळे आयटीयन्सच्या मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, आयटी क्षेत्रात जबरदस्तीचे राजीनामे टाळण्यासाठी सुसूत्र पद्धतीने कर्मचाऱ्यांची कपात नियमन करण्यासाठी स्पष्ट व बंधनकारक चौकट तयार करण्याची आवश्यकता असणे, आयटीयन्सला कायद्यांच्या संरक्षणात्मक कक्षेत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या करून कामाचे तास, फुल अँड फायनल सेटलमेंट, आणि पीएफ पालन यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक असणे. कामाचे तास वाढवले जात असताना औद्योगिक विवाद अधिनियम अंतर्गत कामगार संज्ञेची आयटी क्षेत्रासाठी स्पष्ट व्याख्या नसल्याने आयटी कर्मचारी अजूनही अनेक संरक्षणात्मक कायदेशीर चौकटींच्या बाहेर असणे, फेअर बॅकग्राऊंड व्हेरिफिकेशन फुल अँड फायनल सेटलमेंटमध्ये होणारा विलंब पीएफच्या तफावती, ९० दिवसांच्या नोटीस पिरीयडची सक्ती ही गंभीर समस्या असणे, योग्य सक्षम

तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध नसल्याने असुरक्षित आयटीयन्सच्या तक्रारीकरिता फास्ट-ट्रॅक लेबर कोर्ट प्रणाली/आयटी ट्रायब्युनल’ सुरू करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला श्री. संजय देरकर, वि.स.स. यांचा "पुनवट (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील ग्रामपंचायतीच्या मालकीची शासकीय जमीन खाजगी शिक्षण संस्थेस दिल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २९९२४.

**(ब) तारांकित प्रश्न**

**(क) तारांकित प्रश्नांबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे**.

**प्रा. डॉ. अशोक ऊईक, मंत्री**
----------------
**श्री. इंद्रनील नाईक, राज्यमंत्री**

**(१) आदिवासी विकास मंत्री** : "दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री. हारून खान व इतर वि.स.स यांच्या "शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील आदिवासी लाभार्थ्यांच्या घरकुलाची मजूरी प्रलंबित असल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २५२८२ ला अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**श्री. नरहरी झिरवाळ, मंत्री**
----------------
**श्री.योगेश कदम, राज्यमंत्री**

**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री** : "दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर, वि.स.स यांच्या "पुणे शहरात ब्लिंक इट या ऑनलाईन अन्न वितरण सेवेद्वारे कालबाह्य खाद्यपदार्थांचे वितरण होत असल्याबाबत" या तारांकित प्रश्न क्रमांक २३६२० ला अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(ड) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २३ ते ३३ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | | |
|---|---|---|---|
| **मा. मुख्यमंत्री**<br>----------------<br>**ॲड. आशिष शेलार, सामान्य प्रशासन, मंत्री** | (१) | **मुख्यमंत्री** | : महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| **श्री. हसन मुश्रीफ, मंत्री**<br>----------------<br>**श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री** | (२) | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे लेखे अहवाल व सन २०२४ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| **श्री. प्रताप सरनाईक, मंत्री**<br>----------------<br>**श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री** | (३) | **परिवहन मंत्री** | : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : औचित्याचे मुद्दे**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**मा.मुख्यमंत्री (गृह)**
-------------
**श्री. योगेश कदम, (गृह) राज्यमंत्री**

"नाशिक शहरात दिवसेंदिवस वाढते गुन्हेगारीचे प्रमाण, विशेषत: यामध्ये अल्पवयीन गुन्हेगारांचे वाढते प्रमाण, शहरात लोंढे, बागूल, पवार, निकम या टोळयांमध्ये अल्पवयीन मुलांचा समावेश असणे, शहरातील मुंबईनाका हद्दीत त्र्यंबकरोडवर तीन अल्पवयीन मुले सार्वजनिक ठिकाणी हुल्लडबाजी करत असल्याचा व्हिडीओ नागरीकांनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये पोलिसांना पाठवल्यानंतर पोलीसांनी तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेणे, सदर मुलांच्या पालकांवर पोलीसांद्वारे कठोर कारवाई करण्यात येणे, तसेच मुलांकडून अशी चूक होणार नाही असे हमीपत्रे घेण्यात येणे, तसेच नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगणा-या एका बंदीवानाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २६ ऑक्टोबर, २०२५ रोजी घडणे, सदर कैद्याच्या आत्महत्येचे गुढ अजून सुटलेले नसणे, सदर प्रकरणी पारदर्शक चौकशी करण्याची आवश्यकता, तसेच शहरातील वाढते गुन्हेगारीचे प्रमाण विशेषत: अल्पवयीन गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. संग्राम जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**मा.मुख्यमंत्री (गृह)**

-------------

**श्री. योगेश कदम, (गृह) राज्यमंत्री**

----------------

**डॉ. पंकज भोयर, (गृह) राज्यमंत्री**

"अहिल्यानगर जिल्ह्यातील पारधी समाजसेविका सुमन काळे यांचा माहे मे, २००७ मध्ये पोलीस कोठडीत संशयास्पद मृत्यू झालेला असणे, प्रारंभी सदर प्रकरणात आत्महत्येची नोंद केलेली असणे, परंतु उपविभागीय दंडाधिकारी यांच्या चौकशीत सुमन काळे यांना पोलीसांनी अमानूष मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने दुर्देवी मृत्यू झाल्याचे स्पष्ट होणे, सदर प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांच्याकडे वर्ग करूनही आजपर्यंत सदर विभागाने कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नसणे. मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर काही आरोपींवर गुन्हे दाखल झालेले असणे, मात्र सदर आरोपींवर खुनाऐवजी आत्महत्येस प्रवृत्त केल्याची कलमे लावलेली असणे, तसेच सदर प्रकरणातील एका खाजगी डॉक्टराला मा.उच्च न्यायालयाने दिलासा दिल्यानंतर, संबंधित विभागाने या विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केलेले नसणे, आज रोजी सदर प्रकरण मा. जिल्हा व सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे प्रलंबित असणे, सदर प्रकरणाच्या तपासाबाबत अनुसूचित जाती-जमाती आयोगानेही नाराजी व्यक्त केलेली असणे, या पार्श्वभूमीवर सदर प्रकरणात तात्काळ स्वतंत्र विशेष तपास पथक (SIT) स्थापन करून प्रकरण सीआयडीकडून SIT कडे वर्ग करणे, अॅट्रॉसिटी कायद्यान्वये योग्य कलमवाढ करणे, तसेच मयत सुमन काळे व त्यांचे कुंटूंबिय यांना न्याय देण्यासाठी प्रकरणातील न्यायप्रक्रिया गतिमान करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**मा.मुख्यमंत्री (ऊर्जा)**

----------------

**श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, ऊर्जा, राज्यमंत्री**

"पिंपळनेर (ता.साक्री, जि.धुळे) येथे १३२/३३ के. व्ही. क्षमतेचे उपकेंद्र व्हावे म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांचेकडून होत असलेली मागणी, मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन उर्जामंत्री यांनी दिनांक २३ जून, २०२१ रोजी १३२/३३ के.व्ही. क्षमतेचे विज उपकेंद्र पिंपळनेर येथे उभारणेसाठी मान्यता देणे, उपकेंद्रासाठी सुकापूर ता.साक्री येथील सरकारी जमीन गट क्र. १३७ क्षेत्र २ हे.२५ आर उपलब्ध करुन देणे, सदर प्रकल्पासाठी वारंवार निविदा काढण्यात येऊनही कुठलाच स्थानिक ठेकेदार प्रकाल्पाचे काम करण्यास समोर येत नसणे, दिनांक १४ ऑगस्ट,२०२५ रोजी मध्य प्रदेश मधील भोपाळ येथील टेस्ला या कंपनीस कार्यारंभ आदेश देणे,आदेश देऊन ६ महिन्यांचा कालावधी उलटला असतांना संबंधीत कंपनीने आतापर्यंत केवळ साईटवर पाण्याच्या उपलब्धतेसाठी बोअरवेल मारणे, या व्यतिरीक्त तार कंपाऊंड करणे, गोडाऊन बांधणे इत्यादी किरकोळ कामांसह आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामुग्रीबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही न करणे, तसेच विज उपकेंद्राचे टॉवर उभे करणे, लाईन ओढणे व त्यानुषंगाने आवश्यक असलेली कामे करण्याचा कार्यारंभ आदेश शर्वरी इलेक्ट्रिकल्स छत्रपती संभाजीनगर

(औरंगाबाद) या कंपनीस माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान देण्यात येणे, सदर कंपनीने देखील आजतगायत कुठल्याच प्रकारचे काम न करणे, परिणामी पिंपळनेर, ता.साक्री येथील मंजूर असलेल्या १३२/३३ के.व्ही.उपकेंद्राचे काम अद्यापही सुरु न होणे,शासनाने सदर प्रकरणी तातडीने चौकशी करुन पिंपळनेर येथील मंजूर उपकेंद्राचे काम वेळेत पूर्ण होण्यासाठी केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्री. अनुपभैय्या अग्रवाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री**
----------------
**श्री.योगेश कदम, राज्यमंत्री**

"धुळे शहर हे सर विश्वेश्वरैया यांच्या रचनेतून वसलेले असणे, तसेच धुळे शहरातील सर्व्हे क्रमांक ११३ मध्ये असलेल्या नैसर्गिक नाल्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचा प्रकार निदर्शनास येणे, अतिक्रमणामुळे नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहात बदल होणे, त्यामुळे भविष्यात जीवितहानी तसेच वित्त हानी होण्याची दाट शक्यता असणे, त्यामुळे सदर अतिक्रमण काढण्याबाबत वेळोवेळी शासनाकडे स्थानिक नागरिक व लोकप्रतीनिधी यांच्याकडून मागणी करण्यात येणे, सदर अतिक्रमण काढण्यासंदर्भात एक वर्षाच्या आत कार्यवाही करण्याबाबत शासनाकडून आश्वासित करण्यात येणे, जिल्हा प्रशासनाकडून अतिक्रमण काढण्यास दिरंगाई हाणे, सदर अतिक्रमणामुळे नाल्याची रुंदी २०० फुटावरुन १०० फुटापर्यंत होणे, जिल्हा प्रशासनाकडून अतिक्रमण काढण्याबाबत हायकोर्टात बाजू खंबीरपणे मांडण्यात न येणे, शहरातील अनेक रस्ते, ओपन स्पेस, सरकारी जागा अतिक्रमणाच्या विळख्यात असणे, पावसाळा जवळ असल्यामुळे अतिक्रमण काढणे अत्यंत गरजेचे असणे, आर्थिक व जिवीतहानी होण्याची शक्यता असणे, अतिक्रमणाबाबत प्रशासनाकडून अद्यापही काहीही कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण होणे, सदर अतिक्रमण तातडीने काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(५) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**श्री. हसन मुश्रीफ, मंत्री**
----------------
**श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री**

"अकोला (जि. अकोला) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील परीचारीकांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०२६ रोजी काम बंद आंदोलन पुकारणे, तत्पूर्वी दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींद्वारे सदर रुग्णालयातील भेटीदरम्यान रुग्णालयीन व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळून येणे, यामुळे विसंवादाची परिस्थिती निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर रुग्णालयामध्ये कर्मचारी वर्ग अपुरा असल्याची बाब समोर येणे, विद्यमान परिस्थितीत ७७१ परीचारीकांपैकी फक्त ३१७ पदे कार्यरत असून शेष ४५४ पदांच्या भरतीचा प्रस्ताव आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांनी प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण यांना दिनांक ३ सप्टेंबर, २०२४ रोजी सादर केलेला असणे, सदर प्रस्तावानुसार वर्ग १ ते वर्ग ४ संवर्गांची पद निर्मिती करून भरती

करणे, सर्वोपचार रुग्णालयात प्रतिदिन सुमारे २५०० बाह्यरुग्णांना तसेच ४०० अंतररुग्णांना सेवा पुरविणे, सदर वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी व खाटांच्या संख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे निकषांप्रमाणे पद निर्मिती / भरती करण्यास शासनाची आवश्यक असलेली मंजुरी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**श्री. गणेश नाईक, मंत्री**

"रायगड जिल्ह्यातील ता.उरण, मौजे चाणजे येथील गट क्र. २३ व २४ या जमिनीच्या अधिकार अभिलेखातील “वने” नोंद कमी करण्याबाबत श्री.परसिव्हल जोसेफ परेरा यांनी दाखल केलेल्या याचिका क्र.४६२८/१९८८ मधील मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २२/०९/१९८९ च्या आदेशाची अंमलबजावणी फेरफार क्र. ४८०१ (०९/०७/१९९१) द्वारे यापूर्वीच करण्यात आलेली असणे, त्यानंतर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या दिनांक १३/०७/२००० रोजीच्या परिपत्रकानुसार वनसंरक्षक यांच्या दिनांक १७/०४/२००१ रोजीच्या आदेशानुसार व तहसीलदार उरण यांच्या दिनांक १९/०३/२००१ च्या निर्णयानुसार या जमिनीवर “महाराष्ट्र शासन वने” अशी नोंद करण्यात आलेली असणे, याचिका क्र. ९४३६/२०१० मधील दिनांक ०६/०५/२०१५ च्या आदेशात फक्त पूर्वीच्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत खुलासा मागविण्यात आला असणे, तसेच दिनांक २७/०७/२०२५ च्या आदेशात “वने” नोंद कमी करण्याबाबत कोणताही स्पष्ट निर्देश नसणे, दरम्यान, महाराष्ट्र खाजगी वन (अधिग्रहण) अधिनियम १९७५ च्या कलम २२(अ) अंतर्गत दाखल केलेले अपील उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडे प्रलंबित असणे, अशा स्थितीत महसूल प्रशासनाकडून दिनांक १२/०९/२०२४ चे पत्र निर्गमित करून “वने” नोंद कमी करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याने प्रशासकीय अधिकाराचा अतिक्रमण झाल्याची गंभीर शंका निर्माण झाली असणे, शासनाने या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दिनांक १२/०९/२०२४ चे पत्र रद्द तसेच सदर जमिनीवरील “वने” नोंद कमी करण्यासंबंधी किंवा प्रस्तावित कार्यवाहीस स्थगिती देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री.अशोक पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

**श्री. नितेश राणे, मंत्री**

"गेटवे ऑफ इंडिया येथील जेटी क्रमांक ५ असुरक्षित घोषित करून प्रवासी वाहतूक बंद करण्यात आली असताना, मुंबई पोर्ट प्राधिकरणने रॉयल बॉम्बे यॉट क्लबला फ्लोटिंग पॉन्टून उभारण्यास परवानगी दिल्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असणे, स्वतंत्र संरचनात्मक लेखापरीक्षण झाले का, त्याचा

अहवाल सार्वजनिक केला जाणार का, तसेच निविदा प्रक्रिया, करार अटी व महसूल वाटपाची माहिती सभागृहास देण्यात येण्याची आवश्यकता, महसूलातील मोठा हिस्सा खासगी संस्थेकडे जात असल्याने ही व्यवस्था पुनरावलोकनास पात्र असणे, पर्यायी जेटीचा विचार न करता घेतलेल्या निर्णयांमुळे स्थानिक नौकाधारकांचे आर्थिक नुकसान झाले असून त्यांच्या संरक्षणासाठी उपाय करणे अपेक्षित असणे, यॉट क्लबच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकांच्या जागेवरील कथित अतिक्रमणावर कारवाई होणार का असा प्रश्न निर्माण होणे, या निर्णय प्रक्रियेत सहभागी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून हितसंबंध संघर्ष व संभाव्य आर्थिक अनियमिततेची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चेच्या सूचना)**

**(१) सर्वश्री. संजय केळकर, निलेश राणे, शेखर निकम, प्रशांत ठाकूर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

**मा. मुख्यमंत्री,**

**मा.उपमुख्यमंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम),**

**श्री. गणेश नाईक, वने मंत्री**

**श्री. शिवेंद्रसिंह भोसले, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**

**श्री. उदय सामंत, उद्योग मंत्री**

**श्री. शंभूराज देसाई, पर्यटन मंत्री,**

**ॲड. आशिष शेलार, माहिती तंत्रज्ञान मंत्री**

**श्री. दत्तात्रय भरणे, कृषी मंत्री**

"राज्यात कोकण विभागाला (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) लाभलेले नैसर्गिक सौंदर्य, समुद्रकिनारे, डोंगररांगा आणि सांस्कृतिक वैशिष्टयांमुळे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण केंद्र ठरले असणे, कोकणात विशेषतः मुख्यमंत्री कृषी आणि अन्न प्रक्रिया योजना, फळ प्रक्रिया योजना, अन्न प्रक्रिया उद्योग इत्यादींना कृत्रिम बुध्दिमतेची सांगड घालून काजु बोंडापासून अल्कोहोल निर्मिती, आंब्यासारखे नगदी व निर्यातक्षम उत्पन्न व मच्छिमारी इत्यादींमुळे रोजगार निर्मिती झाली असणे, अपूर्ण पायाभुत सुविधा, वारंवार होणारी पूरस्थिती, औद्योगिक गुंतवणूकीचा अभाव व युवकांचे स्थलांतर या प्रमुख आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कोकण विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता, देशी गोवंश संवर्धन, 'कोकण कपिला' प्रसार व ब्रिडींग सेंटरसाठी विशेष अनुदान देण्याची आवश्यकता, कोकण कृषी विद्यापीठांतील रिक्त पदे भरण्याची आवश्यकता, या विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर कृषी शिक्षण संस्था स्थापन करण्याची आवश्यकता, आसाम राज्याच्या धर्तीवर सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये किमान १० टक्के बांबु उत्पादन आरक्षित करण्याचे धोरण राबविण्याची आवश्यकता, मुंबई-गोवा महामार्गाचे उर्वरित काम पुढील १ वर्षांत पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कालबध्द कार्यक्रम जाहिर करण्याची आवश्यकता, या महामार्गावर प्रत्येक २५ कि.मी. अंतरावर ट्रॉमा केअर सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, नर्सिंग कॉलेज आणि मरिन टॅक्नोलॉजी कॉलेज सुरु करण्याची आवश्यकता, कोकणातील धार्मिक स्थळांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, वन्यजीव प्राण्यांपासून शेतीचे नुकसान टाळण्यासाठी सह्याद्री संवर्धन प्रकल्प पूर्ण क्षमतेने राबविण्याची आवश्यकता, डोंगराळ

भागातील पाण्याचे व्यवस्थापन करण्याची आवश्यकता, सौरऊर्जेचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने निकालात काढण्याची आवश्यकता, आयटी पार्क उभारुन युवकांसाठी स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करण्याची आवश्यकता, अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालय शासन स्तरावर उभारण्याची आवश्यकता, आपत्कालीन परिस्थितीसाठी एअर ॲम्बुलन्स सेवा सुरु करण्याची आवश्यकता, कोकणचा कॅलिफोर्निया करण्याकरिता कोकण विकास प्रकल्पाचे मार्गदर्शन व उचित कार्यवाहीसाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची आवश्यकता, सर्वसामान्य नागरिकांना उचित माहिती मिळावी यासाठी सार्वजनिक ऑनलाईन डॅशबोर्ड उपलब्ध करण्याची आवश्यकता, यावाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**श्री. भरत गोगावले, फलोत्पादन,**

**श्री. नितेश राणे, मत्स्यव्यवसाय मंत्री**

**श्री. प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**

(२) **सर्वश्री. भास्कर जाधव, आदित्य ठाकरे, सुनिल प्रभु, अजय चौधरी, अनंत (बाळा) नर, महेश सावंत, हारुन खान, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"कोकणात पर्यटन व मत्स्य व्यवसाय विकास प्रकल्पांची घोषणा होऊनही न झालेली पूर्तता, गेल्या ८ ते १० वर्षापासून कोकणात सततची वादळे, चक्रीवादळे, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस इत्यादिमुळे आंबा, काजू इत्यादी फळबागायतदारांचे तसेच मच्छिमार व पर्यटन व्यवसायाचे झालेले नुकसान, शासनाकडून देण्यात येणारी तुटपुंजी मदत, गेल्या १८ वर्षापासून प्रलंबित असलेला मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, ग्रीन फिल्ड महामार्गाची केवळ घोषणा, चिपळूण-कराड रखडलेला रेल्वे प्रकल्प, रासायनिक कारखान्यांमुळे नद्या, समुद्र व जमीनी प्रदुषित होणे, रोजगार नसल्यामुळे कोकणातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त घरे बंद असणे, मत्स्य दुष्काळ व मच्छीमारांच्या कर्ज माफीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, कोकणातील संपूर्ण किनारपट्टी सिडकोला देण्याचा घातलेला घाट, मुद्दाम वणवे लावून नष्ट होत असलेली वनसंपदा, माकडे व अन्य प्राण्यांपासून शेती व बागायतदारांचे होत असलेले नुकसान, जलजीवन मिशन योजनेचा कोकणात उडालेला बोजवारा, कोकणातील गेल्या २५ वर्षापासून प्रलंबित असलेले सिंचन प्रकल्प, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ नसणे, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, कोकणच्या विकासासाठी अनेक समित्या नियुक्त होणे, सदर समित्यांच्या अहवालातील शिफारशीवर कोणतीही कार्यवाही न होणे, कोकणातील मुलभूत प्रश्नांविषयी शासनाने करावयाच्या उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**मा. मुख्यमंत्री**

**मा.उपमुख्यमंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)**

**श्री. गिरीश महाजन, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ),**

**श्री. गणेश नाईक, वने मंत्री**

**श्री. गुलाबराव पाटील, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री**

**श्रीमती पंकजा मुंडे, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री**

**श्री. शंभूराज देसाई, पर्यटन मंत्री**

**श्री. दत्तात्रय भरणे, कृषी मंत्री**

**श्री. प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री**

**श्री. भरत गोगावले, फलोत्पादन, मंत्री**

**श्री. मकरंद पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री**

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

श्री. गणेश नाईक, वने मंत्री

**(क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विधानपरिषदेने संमत केल्यास विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री

--------------

श्री.योगेश कदम, राज्यमंत्री

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

